CR1968060322

तुकडेबंदी व तुकडेजोड कायद्याखाली जमिनीच्या
झालेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक १०६८-४७२००-ल,
सचिवालय, मुंबई ३२, दिनांक ३ जून १९६८.

परिपत्रक
=============

जमिनीच्या खरेदी विक्रीकरिता तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी न घेता जमिनीचे केलेले हस्तांतरण वगैरे व्यवहार हे सदर कायद्याच्या कलम ९ प्रमाणे अवैध होत असतात. मात्र दिनांक १५ नोव्हेंबर, १९६५ पूर्वी झालेले अवैध व्यवहार, नवीन कलम ३१-अ प्रमाणे वैध करण्याची आता तरतूद केलेली आहे अशा प्रकारची गैरकायदेशीर हस्तांतरणे अवैध ठरविण्याचे अधिकार वरील कलमान्वये जिल्हाधिकारी उपजिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत. शिवाय या तरतुदीच्या अंमलबजावणीच्या बाबतीत उपस्थित होणाऱ्या मुद्यांसंबंधी शासनाने पूर्वीच स्पष्टीकरण दिलेले आहे. (महसूल व वन विभाग, परिपत्रक क्रमांक सी.ओ. एन. १०६६-१८२८१५-ल, दिनांक ९ नोव्हेंबर, १९६६ आणि क्रमांक सी.ओ.एन. ३२६६-२४४६७८-ल, दिनांक ७ फेब्रुवारी १९६७ पहा). तेव्हां अशा प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांना जमाबंदी आयुक्तांचा अभिप्राय मागविण्याची आवश्यकता भासू नये. एखाद्या प्रकरणांत अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता वाटल्यास त्याबाबत विभागीय आयुक्तांचे आदेश घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(सही) ज. गो. करंदीकर,
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

प्रति
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे.

======

क्र. कान- एल. आर. ४
पुणे दि. 22-६-६८

प्रत एकत्रीकरण अधिकारी सर्व यांचेकडे (सहायक एकत्रीकरण अधिकारी यांचे कार्यालयांस पाठविणे प्रतीक्षेत) रवाना.

(सही) 24/6

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, पुणे करिता.

ति-२१६६८